SURVIVORS Against TB

## *माध्यम पाठ्यवृत्ती*

### *पार्श्वभूमी*

सर्व्हायव्हर अगेन्स्ट टीबी (एसएटीबी) ही वस्तीवर आधारीत चळवळ आहे. भारताला टीबीशी लढा देण्यासाठी सक्षम करणाऱ्या टीबी सर्व्हायव्हर्सतर्फे या चळवळीचे नेतृत्व करण्यात येते. या सर्व्हायव्हर्सना अत्यंत गंभीर स्वरुपाच्या टीबीची जाणीव आहे आणि त्यांनी अशा प्रकारच्या टीबीचा यशस्वी सामना केला आहे. त्याचप्रमाणे टीबी झालेल्या व्यक्तीला कोणत्या प्रकारच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीला सामोरे जावे लागते, याची त्यांना व्यवस्थित माहिती आहे. या अनुभवांच्या आधारे, टीबीवरील उपचार अधिक सुलभ पद्धतीने उपलब्ध होण्यासाठी आणि रुग्णकेंद्री होण्यासाठी काय करावे लागेल याबाबत हे सर्व्हायव्हर्स इतर भागधारकांच्या सहकार्याने प्रचार करतात. भारताला टीबीची समस्या सर्वंकषपणे समजून घेऊन त्यावर उपाययोजना करायची असेल तर सर्व्हायव्हर्सचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे आणि त्यांच्यावर सर्वात जास्त परिणाम करणाऱ्या धोरणनिर्मिती प्रक्रियेत त्यांना समाविष्ट करून घेतले पाहिजे, असा एसएटीबीचा विश्वास आहे.

### *विषय:*

### *टीबीशी संबंधित कलंक: कारणे, उपाययोजना आणि टिकाव धरून राहिलेल्यांच्या कथा.*

आम्ही टीबी सर्व्हायव्हर्ससोबत केलेल्या कामाच्या अनुभवावरून दिसून आले की, टीबी या रोगाशी अत्यंत सखोल असा कलंकीतपणाचा घटक जोडला गेलेला आहे. एकीकडे टीबीशी संबंधित भागधारक रुग्णांना प्राधान्य देणाऱ्या रुग्णकेंद्री उपचारांची मागणी करत असले तरी रुग्णांना उपचार घेण्यापासून आणि परिणामकारकपणे बरे होण्यापासून कलंकितपणाचा घटक परावृत्त करत असतो.

टीबीशी जोडला गेलेला कलंक हा आरोग्यदायी आचरणामध्ये मोठा अडथळा समजला जातो आणि त्यामुळे प्रचंड त्रास होतो. प्रतिष्ठा गमावण्याची भीती, वैवाहिक समस्या आणि समाजाकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक यामुळे टीबी झालेली व्यक्ती अनेकदा उपचार करून घेण्यासाठी पुढाकार घेत नाही. याच कलंकामुळे उपचार नियमितपणे घेतले जात नाहीत आणि त्या रुग्णाच्या कुटुंबियांच्या रुग्णाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरही परिणाम होतो. परिणामी, रुग्णाची मानसिकता आणि स्वास्थ्य ढासळते.

समाजाची वागणूक, संस्थात्मक पातळीवर दुर्लक्ष आणि या अनिष्ट रोगाबद्दल असलेले गैरसमज यामुळे हा कलंक तयार होतो. टीबी हा संसर्गजन्य आहे हे या कलंकामागचे सर्वसामान्यपणे आढळणारे कारण आहे. त्याचप्रमाणे टीबीचा संबंध एचआयव्ही, गरीबी, सामाजिक स्तर आणि कुपोषणाशी असल्याने त्याला कलंक मानले जाते. त्यामुळे मानसिक धक्का बसतो, भेदभाव होतो, निदान करण्यास विलंब होतो आणि उपचारही पूर्ण करण्यात येत नाहीत.

### *द फेलोशीप/ पाठ्यवृत्ती*

भारतावर टीबीचे सर्वात जास्त ओझे आहे आणि दर मिनिटाला एका भारतीयाचा टीबीमुळे मृत्यू होत आहे. असे असताना आपण टीबीच्या रुग्णांबद्दल असा भेदभाव का बाळगतो? हवेवाटे पसरणाऱ्या या रोगाची लागण त्यांना झाली, यात त्यांचा दोष काय? टीबी झालेल्या रुग्णाला कलंकाचा सामना करावा लागू नये, यासाठी आपण काय करू शकतो?

पाठ्यवृत्तीधारकांनी भारतातील या समस्या खोलात जाऊन आणि व्यापक दृष्टिकोन ठेवून जाणून घेणे अपेक्षित आहे आणि टीबी रुग्णांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर अशा प्रकारच्या कलंकांचा काय परिणाम झाला आहे आणि त्यासंदर्भात असलेली आरोग्य सेवा यंत्रणा याबाबतच्या कथा समाजासमोर आणणे अपेक्षित आहे.

या विषयाला अधोरेखित करणाऱ्या सर्वंकष, माहितीपूर्ण आणि विस्तृत बातम्या मिळवाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे. विशेषत: स्थानिक मुद्द्यांवर प्रकाश टाकणाऱ्या बातम्यांमध्ये आम्हाला स्वारस्य आहे. त्याचप्रमाणे कलंकाच्या आव्हानावरील उपाययोजना, सर्व्हायव्हलच्या आणि या आव्हानावर मात केलेल्यांच्या कथाही आम्हाला हव्या आहेत.

ही पाठ्यवृत्ती एकूण ३ हिंदी, गुजराती आणि मराठी मुद्रित प्रसारमाध्यमांमधील पत्रकार/ मुक्त पत्रकार/ स्वतंत्र स्तंभलेखक यांच्यासाठी खुली आहे. या पाठ्यवृत्तीधारकांनी प्रत्येकी ३ (किमान) ते ४ (कमाल) लेख लिहिणे अपेक्षित आहे.

## ***कालावधी आणि विद्यावेतन***

ही फेलोशिप सहा आठवड्यांच्या कालावधीसाठी असेल आणि यासाठी निवड झालेल्या प्रत्येक पाठ्यवृत्तीधारकाला रु. ५०,०००/- इतका विद्यावेतन उपलब्ध करून देण्यात येईल. या विद्यावेतनामध्ये संशोधन, प्रवास, लेखन, निर्मिती आणि इतर खर्चाचा समावेश असेल. विद्यावेतन दोन टप्प्यांमध्ये वितरित केले जाईल. या पाठ्यवृत्तीधारकांनी प्रत्येकी ३ लेख लिहिणे व प्रकाशित करवून घेणे अपेक्षित आहे.

## ***अर्ज करण्यासाठी आवश्यकता***

- फेलोशिपसाठी अर्ज करण्यासाठी खालील कागदपत्रे सादर करावी:
- कव्हर लेटर, सीव्ही (केवळ ३ ए४ पानांमध्येच असावा)
- यापूर्वी प्रकाशित झालेल्या कामाचे दोन नमुने. काम स्थानिक भाषेत प्रकाशित झाले असेल तर कृपया भाषांतर उपलब्ध करून द्यावे.
- सध्याचे एम्प्लॉयर/संपादक यांच्याकडून 'सहकार्याचे पत्र' आवश्यक आहे. पाठ्यवृत्तीधारकांना सहा आठवड्यांचा कालावधी/रजा दिली जाईल आणि या पाठ्यवृत्तीधारकांनी लिहिलेले लेख त्यांच्या प्रकाशनात प्रकाशित केले जातील याची हमी या पत्रात नमूद केलेली असणे आवश्यक आहे.
- कृपया उत्तर द्या:
  - तुम्हाला एसएटीबी पाठ्यवृत्ती का करायची आहे आणि त्याने तुमच्या करिअरला कशा प्रकारे लाभ होणार आहे?

- ○ तुमच्या पाठ्यवृत्ती कालावधीमध्ये तुम्ही एका विशिष्ट विषयावर लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे. तुम्हाला कोणत्या विषयाचे संशोधन आणि शोध घ्यायला आवडेल आणि का?
- अर्जदारांनी आपले अर्ज ३० जानेवारी २०१८ पर्यंत survivorsagainsttb@gmail.com या ईमेल ॲड्रेसवर पाठवावेत. या संदर्भात काही शंका किंवा प्रश्न असल्यास एसएटीबीच्या ॲडव्होकसी आणि कम्युनिकेशन्स विभागाच्या व्यवस्थापक कृतिका कामथन यांच्याशी +९१ ८१३०६६६०३७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

*टिप्पणी*

- पाठ्यवृत्तीधारकांना कदाचित दिल्ली येथे आयोजित करण्यात येणाऱ्या परिचय कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे लागेल.
- बौद्धिक संपदा हक्क प्रकाशनाकडे असतील, असे असले तरी या विषयाशी संबंधित वेबसाईट्स आणि ब्लॉगवर हे लेख प्रकाशित करण्याचा हक्क एसएटीबीकडे असेल.
- पाठ्यवृत्तीधारकाने किमान पातळी साध्य केली नाही तर पाठ्यवृत्ती न देण्याचा अधिकार एसएटीबीकडे असेल.
- एसएटीबीतर्फे घेण्यात आलेला निर्णय अंतिम असेल
- सर्व अर्जांची एसएटीबी आणि बाह्य परीक्षकातर्फे पडताळणी करण्यात येईल.
- निवड झालेल्या अर्जांची घोषणा ५ फेब्रुवारी २०१८ रोजी करण्यात येईल. १५ मार्च २०१८ रोजी पाठ्यवृत्तीची सांगता होईल.